महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २८ /०६/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र.बैठक -०१२०/ प्र.क्र.२०/विशा-१अ, दिनांक २६.०६.२०२३.

**विषय :-** क्रिकेट सामन्यांसाठी पुरवाव्या लागणाऱ्या पोलीस बंदोबस्ताच्या शुल्काची दरनिश्चिती करण्याबाबत.

******

**परिपत्रक**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र.बैठक-०१२०/ प्र.क्र.२०/विशा-१अ, दि.२६.०६.२०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०६२६१५२१११२०८२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

२८/०६/२०२३
( सुनीता चौधरी )
कार्यालय अधीक्षक
पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
पोलीस आयुक्त, पुणे / नागपूर / नवी मुंबई.
कार्यासन अधिकारी, का.क्र.३३ व ३४



Scanned with CamScanner

**क्रिकेट सामन्यांसाठी पुरवाव्या लागणाऱ्या पोलीस बंदोबस्ताच्या शुल्काची दरनिश्चिती करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र. बैठक-०१२०/प्र.क्र.२०/विशा-१ अ**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २६ जून, २०२३.

<u>वाचा</u> :- १) शासन पत्र क्र. संकीर्ण ०२१६/५४४/प्र.क्र.१८/ विशा १ अ, दिनांक १७.०३.२०१६.
२) शासन निर्णय क्र.संकीर्ण ०३१७/२०५८/ प्र.क्र.३१/विशा १ अ,दिनांक २८.६.२०१७.
३) शासन निर्णय क्र. संकीर्ण ०३१८/९३४०/ प्र.क्र.९२/ विशा १ अ, दिनांक १२.११.२०१८.

**<u>प्रस्तावना:-</u>**

महाराष्ट्रामध्ये मुंबई, नागपूर, पुणे, नवी मुंबई या ठिकाणी क्रिकेटचे सामने आयोजित करण्यात येतात. सदर क्रिकेट सामन्यांमध्ये संघाची लोकप्रियता व स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन सामन्याकरीता आवश्यकतेनुसार विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येतो. विविध कालावधीमध्ये विविध ठिकाणी खेळविण्यात येणाऱ्या क्रिकेट सामन्यांकरीता शासन निर्णय क्र.संकीर्ण-०३१८/९३४०/प्र.क्र.९२/विशा-१ अ दिनांक १२.११.२०१८ अन्वये दिनांक ०१.०४.२०१८ ते दिनांक ३१.०३.२०१९ या कालावधीकरिता सामनानिहाय ठोक रक्कम आकारण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. सदर कालावधी दिनांक ३१.०३.२०१९ रोजी संपुष्टात आला आहे. सबब, सन २०१९-२०२० ते २०२३-२०२४ या कालावधीकरीता दरनिश्चितीचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता राज्यात नविन दर लागू करण्यास शासन मान्यता प्राप्त झाली. तथापि सदर नविन दर केव्हा पासून लागू करावे ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

सदर शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्रामध्ये मुंबई, नागपूर, पुणे, नवी मुंबई या ठिकाणी क्रिकेटच्या सामन्याकरीता पोलीस बंदोबस्त शुल्काचे दराबाबत यापूवी निर्गमित केलेले संदर्भाधीन क्रमांक १ ते ३ येथील शासन पत्र व शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत. संपूर्ण राज्यात आयोजित करण्यात येणा-या क्रिकेट सामन्यांसाठी प्रति सामना पोलीस बंदोबस्ताचे खालीलप्रमाणे दरशुल्क आकारण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | क्रिकेट सामन्याचा प्रकार | प्रत्येक सामन्याचे बंदोबस्त शुल्क (प्रति सामना) |
|---|---|---|
| १. | टी-२० आंतरराष्ट्री सामना/आयपील | रु. १० लाख |
| २. | एक दिवसीय आंतरराष्ट्रीय सामना | रु. २५ लाख |
| ३. | कसोटी सामना ( ५ दिवस ) | रु. २५ लाख |

सदर शुल्क आकारताना खालील बाबी विचारात घेण्यात याव्यात.

अ. सदर शुल्काची रक्कम ही सामनानिहाय एक ठोक रक्कम बंदोबस्त खर्च म्हणून निश्चित करण्यात आली आहे.

आ. अतिरिक्त बंदोबस्त शुल्क हे अपवादात्मक परिस्थितीतच (सामन्यांच्या आयोजनाबाबत आलेल्या धमक्यांचा विचार करुन) लागू करण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत अतिरीक्त पोलीस बंदोबस्त शुल्क हे निश्चित केलेल्या शुल्काच्या २५% पेक्षा अधिक आकारण्यात येऊ नये. अतिरिक्त बंदोबस्त शुल्क आकारणीसाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांची रितसर परवानगी घ्यावी.

इ. सदर ठोक रकमेमध्ये स्टेडियमच्या आत व बाहेरील सुरक्षा व्यवस्थेचाही समावेश आहे.

Scanned with CamScanner

ई. सदर क्रिकेट बंदोबस्त शुल्कापोटी प्राप्त होणारी रक्कम ही "००५५- महसूल जमा" या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी .

उ. सदर बंदोबस्ताचे शुल्क हे सन २०११ पासून लागू करण्यात येत आहेत.

ऊ. सदर शुल्क सामना झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत जमा करण्यात यावे. अन्यथा महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ मधील तरतुदीनुसार ९.५% दराने चक्रवाढ पद्धतीने व्याज आकारण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०६२६१५२११२०८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JAHANGIR KYAMUDDIN KHAN

Digitally signed by JAHANGIR KYAMUDDIN KHAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=0514d0441bc151d360aa9723b622b5ac853f58450638828ec27f54c83e1c36e9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=D8DF82CCD86411440F872E806944C68D20B4533D6C7D7079D601D1337F7E8B66, cn=JAHANGIR KYAMUDDIN KHAN
Date: 2023.06.26 15:22:25 +05'30'

**(जहांगीर के. खान)**
**अवर सचिव, गृह विभाग.**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई.
५) सर्व मा. संसद सदस्य / विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
७) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / पुणे / नागपूर / नवी मुंबई.
१०) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
११) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
१२) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
१३) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१५) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
१६) अध्यक्ष, मुंबई क्रिकेट असोसिएशन , मुंबई.
१७) अध्यक्ष, विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूर.
१८) अध्यक्ष, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन, पुणे.
१९) निवड नस्ती.



Scanned with CamScanner